# प्रेसनोट

## कुख्यात गुंड तबरेज सुतारचा साथिदार पिस्टलसह अटक

दिनाक – १२/०६/२०१८ रोजी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे येथे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले यांचे मार्गदर्शनानुसार तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक दत्ताजीराव मोहिते व कर्मचारी पेट्रोलींग करित असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना बातमिदारामार्फत माहीती मिळाली की , कात्रज सर्पोद्यान जवळ एक इसम उभा आहे त्याचे कमरेस देशी बनावटीचे पिस्टल आहे. सदरचा इसम अंगाने मजबुत, चेहरा गोल, रंगाने काळा, अंगामध्ये पांढरे रंगाचा शर्ट त्यावर फुलाफुलांचे बारीक डिझाईन असलेले व निळी जीन्स पॅन्ट घातलेले पायातमध्ये निळे रंगाचा स्पोर्ट शुज घातलेला आहे. सदर बातमी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे यांना कळविली असता त्यांनी योग्य ति कारवाई करण्याचे आदेश दिले.

सदर ठिकाणी पोलीस स्टाफ सह रवाना झालो व मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी थोडे अलीकडे जावुन थांबलो. मिळालेल्या बातमीप्रमाणे सदर ठिकाणी वरील वर्णनाप्रमाणे उभे असल्याचे दिसुन आले. स्टाफच्या मदतीने सदर इसमास पकडुन ताब्यात घेतले त्याने त्याचे नाव व पत्ता किरण बबन सांळुखे वय-३४ वर्षे रा.शिवशंभो गल्ली नंबर ०१, गणेश मंदिराचे समोरील बिल्डींगमध्ये, कात्रज-कोंढवा रोड, कात्रज पुणे असे सांगितले त्याच्या ताब्यातुन १ देशी बनावटीचे पिस्टल व २ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत.सदर आरोपीवर भारती विदयापीठ पोलीस ठाणे येथे भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदर आरोपीवर यापुर्वी मारमारीचा एक गुन्हा दाखल आहे.

सदर आरोपीकडे पिस्टल बाबत चौकशी केली असता ते पिस्टल त्याला त्याचा मित्र रेकार्ड वरिल गुंड तबरेज सुतार याने दिले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तबरेज सुतार हा सध्या कोंढवा पोलीस स्टेशन कडिल मोका मध्ये फरार असुन त्याच्यावर दोन खुन, खुनाचा प्रयत्न, मारामारी, अग्नीशस्त्र बाळगणे अशा प्रकारचे विविध गुन्हे कोथरुड, सहकारनगर, कोंढवा, विश्रामबाग, भारती विदयापीठ पोलीस स्टेशनला येथे दाखल आहेत.

सदर आरोपी याने सदरचे अग्नीशस्त्र जवळ बाळगण्याचा मुख्य उदेश काय आहे तसेच सदर अग्नीशस्त्राच्या साहयाने कोणता गुन्हा करावयाचा होता का याबाबत तपास चालु आहे.

तसेच १. आकाश वालमिक जाधव रा.येवलेवाडी पुणे २. अमर रामदास चोरघे रा येवलेवाडी पुणे यांच्याकडे दोन तलवार मिळाल्याने त्याच्यावरही कारवाई करण्यात आली आहे.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंडे , स्वारगेट विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री राजकुमार वाघचवरे तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप.निरीक्षक दत्ताजीराव मोहिते, पोलीस कर्मचारी पोलीस कर्मचारी अमोल पवार, कुंदन शिंदे, कृष्णा निढाळकर, चंदु फडतरे, दिपक माने, अभिजीत रत्नपारखी प्रणव संकपाळ, उज्वल मोकाशी, सर्फराज देशमुख, गणेश चिंचकर, मंहेश मंडलीक,शिवदत्त गायकवाड यांनी केलेली आहे.